# सारांश

''गोंदिया नगरपालिकेच्या वित्तीय प्रशासनाचा विश्लेषणात्मक अभ्यास'' या विषयांतर्गत विविध घटकांचा संशोधनात्मक आढावा घेऊन माहिती संकलित करण्यात आली आहे. हा शोध प्रकल्प एकूण ५ प्रकरणात विभागलेला असून प्रत्येक प्रकरणात त्यानुसार माहिती, आकडेवारी संकलित करून मांडण्यात आली आहे. प्रत्येक बाबींचा चिकित्सक अभ्यास करून त्यातून निघणारे निष्कर्ष यांचा पडताळा घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आला आहे. सन २०१२-१३ ते २०१४-१५ या तीन वर्षांचा कालखंड अध्ययन कार्याकरिता घेण्यात आला व या कालावधीतील घडामोडींचा विचार करण्यात आला.

पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाचे वर्णन करण्यात आले असून विषयाचे महत्व, स्वरुप, विषयाची व्याप्ती, विषय निवडीची कारणे स्पष्ट करण्यात आली आहेत. सोबतच संशोधनाचा आधार, उद्देश, पद्धती तसेच विषयाची गृहितके यांचे पण विवेचन करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीतील ''गोंदिया नगरपालिकेच्या वित्तीय प्रशासनाचा विश्लेषणात्मक अभ्यास'' करण्याचे दृष्टीने स्थानिक संस्थेचे महत्व, त्यांचा इतिहास, प्रगती व या संस्थेतंर्गत निर्माण केलेली व्यवस्था व त्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

दुसऱ्या प्रकरणांत गोंदिया नगरपालिकेच्या वित्तीय स्थितीचे विश्लेषण या अंतर्गत नगरपालिकेच्या उत्पन्नाची साधने कोणती आहेत, त्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच

विविध विभागाद्वारे प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे.

विविध विभागाद्वारे प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास करण्यासाठी सारण्या तयार करण्यात आलेल्या आहेत. नगरपालिकेने प्रत्येक विभागाकडून केलेला उत्पन्नाचा अंदाज आणि त्या विभागाला मिळालेले वास्तविक उत्पन्न यांचा तुलनात्मक अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे. अंदाजित उत्पन्न व वास्तविक उत्पन्न यामध्ये दिसून आलेल्या फरकाचे शास्त्र शुद्ध विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

तिसऱ्या प्रकरणात गोंदिया नगरपालिकेच्या खर्चाचे विश्लेषण या अंतर्गत सामान्य प्रशासन आणि वसुलीचा खर्च, सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य व सोयी, शिक्षण, संकीर्ण या विभागांतर्फे झालेल्या एकूण खर्चाचा समावेश करण्यात आला आहे. या विभागांच्या माध्यमातून शहराचा विकास साधण्याचा प्रयत्न नगरपालिकेद्वारा केला जातो. प्रस्तुत प्रकरणात वरील विभागांचे सारण्यांच्या सहाय्याने विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. विश्लेषणात्मक अध्ययन करतांना व्ययाच्या दृष्टीकोनातून विविध विभागावरील खर्च किती? वास्तविक खर्च व अंदाजित खर्चाचे परस्पर शेकडा प्रमाण काय? इत्यादी बाबींचा विचार करण्यात आला आहे.

चवथ्या प्रकरणात नगरपालिकेची अंदाजपत्रके व विश्लेषण या अंर्तगत अंदाजपत्रकाची निर्मीती, वैशिष्ट्ये, तत्वे व महत्व स्पष्ट करण्यात आले. अंदाजपत्रक तयार करतांना कोण-कोणती मार्गदर्शक तत्वे अंमलात आणल्या गेली पाहिजेत, या मार्गदर्शक तत्वानुसार नगरपालिका आपली अंदाजपत्रके कशी तयार करतात व ती स्थायी समितीपुढे कशी मंजूर करून घेतात हे स्पष्ट करण्यात आले आहे. याचबरोबर पुरवणी अंदाजपत्रक, तुटीचे अंदाजपत्रक यांचे विवेचन करण्यात आले आहे.

गोंदिया नगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद व प्रत्यक्ष आकडेवारीचा सन २०१२-

१३ ते २०१४-१५ या तीन वर्षांच्या सरासरी तपशीलाचे संकलन करून त्याची मांडणी करून अंदाजपत्रकीय तरतुद व प्रत्यक्ष जमा आणि अंदाजपत्रकीय तरतुद व प्रत्यक्ष खर्च याचे स्वरूप कसे आहे याचा महत्वपूर्ण अभ्यास करून निष्कर्ष काढण्यात आले आहे.

पाचव्या प्रकरणात प्रत्येक प्रकरणाच्या संक्षिप्त सारांशानुसार प्रत्येक प्रकरणामध्ये कोणती तथ्ये आहेत, या तथ्यांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले आहे. विविध प्रकरणातील तथ्य विश्लेषणांतर निष्कर्ष काढण्यात आलीत. या निष्कर्षांना अनुसरून गोंदिया नगरपालिकेने आपल्या नगराचा विकास साधता यावा व उपलब्ध असलेल्या आर्थिक स्थितीत व साधन सामग्रीत अपेक्षित विकास होऊन जनतेला सुखसोयी पुरविण्याचे दृष्टीने राज्य शासनास, नगरपालिका उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने, नगरपालिका व्ययाच्या संदर्भात, प्रशासकीय कार्य, लोकशाहीची परिणामकारकता, शहराचे सौंदर्य या संबंधी शिफारशी व उपाययोजना सुचविण्यात आल्यात.

***